# पुणे विद्यापीठ

एम.आय.सी.,
फोन न. - २५६०१२३४

---

संदर्भ क./एम.आय.सी./४३७ दिनांक : ०२/०३/२०१२

प्रति,
**मा. प्राचार्य,**
**पुणे विद्यापीठ संलग्न महाविद्यालय**
**कला, वाणिज्य व विज्ञान**

**विषयः विद्यापीठाकडून प्राप्त प्रवेशपत्र (Hall Ticket) बाबत...**

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषया संदर्भात सर्व संबंधितांनी खालील बाबींची नोंद घेऊन परीक्षा विभागाचे कामकाज गतिमान करण्यास सहकार्य करावे.

१. विद्यापीठाकडून संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आलेली प्रवेशपत्राबाबतची (Hall Ticket) माहिती प्राप्त झाल्यानंतर महाविद्यालयाने ८ दिवसांचे आत हरकतीबाबत परीक्षा विभागाशी संपर्क साधावा.
२. आपणाकडे असलेल्या संबंधित परीक्षेच्या विद्यार्थी संख्येनुसार प्रवेशपत्राची संख्या पडताळून पाहून काही कमतरता असल्यास तातडीने विद्यापीठ परीक्षा विभागाशी संपर्क साधवा. जसे आपल्याकडील परीक्षा अर्ज जमा केलेल्या यादीनूसार परीक्षा प्रवेशेपत्रांची संख्या इ. तपासून पहावेत. अन्यथा ८ दिवसांचे आत विद्यापीठाशी संपर्क साधून संबंतिध प्रवेशपत्रे आपल्या ताब्यात घ्यावीत. **त्याचबरोबर चूकून आपल्या महाविद्यालयाशी संबंधित नसलेली प्रवेशपत्रे आपल्याकडे आल्यास ती त्वरित यादी करून विद्यापीठात जमा करावीत.**
३. नांव किंवा विषय चुकीचा नमूद झालेला असल्यास त्यासबंधिच्या दुरूस्तीबाबतचे विहित नमूने विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत त्यानूसार ते पूर्ण भरून मा. प्राचार्यांच्या स्वाक्षरीने विद्यापीठाकडे प्रवेशपत्र प्राप्त झाल्यापासून विहित मुदतीत पाठवावेत. मागाहून आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. (बदललेल्या विषयाची सत्रपूर्तता इ. बाबी पूर्ण असणे आवश्यक आहे.)
४. महाविद्यालयाने जुन्या अभ्यासक्रमाचा सहा वर्षे वैध सत्रपूर्तता कालावधी संपूष्टात येऊनही काही विद्यार्थ्यांचे विषय पूर्ण न भरता त्यांचे अर्ज पूर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांप्रमाणे भरून पाठविले असतील तर त्या महाविद्यालयांनी विद्यापीठाशी संपर्क साधून अशा विद्यार्थ्यांचे प्रवेशपत्र योग्य ती कार्यवाही करून घेऊन जावेत.
५. विषय अथवा नाव **दुरूस्तीचे अर्ज** एकत्रितरित्या महाविद्यालयामार्फत **पोस्टाने पाठविणा-या** महाविद्यालयांनी नोंद घ्यावी की, आपले एकतित्र अर्ज **प्रवेशपत्र**

**प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसात विद्यापीठाकडे पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.**

६. एप्रिल, २०१२ करिता अंतर्गत तसेच प्रात्यक्षिक परीक्षांचे गुण हे सोबतच्या सिडीमध्ये दिनांकापर्यंतच पाठवावेत. हे पूर्ण करत असताना त्या सीडीमध्ये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. एकदा जमा केलेले गुण हे अंतीम समजले जातील याची कृपया नोंद घ्यावी. ज्या विद्यार्थ्यांचे आसनक्रमांक सदरच्या सीडीमध्ये नसतील त्यांचे गुण फोर्सफूल एन्ट्री पध्द्तीने सीडीत मांडावेत. प्रिंट केलेले गुणपत्रक व सीडी यामधील गुण हे समान असणे आवश्यक आहेत. केवळ टंकलिखित केलेली गुणपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

७. विद्याठाचे बीसीयुडी/१०५ दिनांक ८ सप्टेंबर, २०११ च्या परिपत्रकानूसार सर्व संलग्न महाविद्यालयांना पुणे युनिव्हर्सीटी नेटवर्क (PUN) या प्रकल्पांतर्गत स्वतंत्र ई-मेल आयडी देण्यात आलेले आहेत. परीक्षाविभागामार्फत येथून पुढे सदरच्या ई-मेल अकाऊंटमध्ये, सर्व प्रकारचा परीक्षेच्या कामकाजासंबंधीचा पत्र व्यवहार केला जाईल. ज्या महाविद्यालयांना विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या ई-मेल अकाऊंटमध्ये कोणत्याही प्रकारची माहिति येत नसल्यास अशा महाविद्यालयांनी आपणास विद्यापीठाने दिलेले ई-मेल पत्ते, महाविद्यालयाचे नाव व परीक्षा विभागाकडून देण्यात आलेला एक्झाम कोड (कॉलेज कोड) या विभगास त्वरित कळवावा.

वरील सूचनांचे पालन न झाल्यास व प्रत्यक्ष परीक्षेच्यादिवशी संबंधित विद्यार्थी विद्यापीठात तक्रार घेऊन येऊ शकतात तरी आपणांस विनंती की, विहित मुदतीत वरील कामे पूर्ण करावीत.

कळावे,

आपला विश्वासू,

परीक्षा नियंत्रक
परीक्षा विभाग